# महाराष्ट्र शासन

**क्रमांक:-संकीर्ण-२०१५/प्र.क्र.४२ /नवि-३२.**
**नगर विकास विभाग,**
मादामा कामा रोड, हुतात्म्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक: **१५** सप्टेंबर ,२०१५.

**प्रति,**
**आयुक्त,**
सर्व महानगरपालिका,

**विषय :- शासनाची दिनांक १ ऑगस्ट २०१५ ची अधिसूचना व त्याबाबत महानगरपालिकांनी करावयाची कार्यवाही.**

**महोदय,**

शासनाने दिनांक ०१ ऑगस्ट २०१५ पासून ५० कोटी पेक्षा कमी उलाढाल असलेल्या व्यापा-यांना स्थानिक संस्था करामधून सूट देण्याचा धोरणात्मक निर्णय घेतला आहे.

या निर्णयाची योग्य प्रकारे अंमलबजावणी होण्यासाठी खालील महत्वाच्या बाबी आपल्या निदर्शनास आणून देण्यात येत आहेत.

**i) ५० कोटीच्या उलाढालीची परिगणना करणेबाबत.**

या अनुषंगाने शासनाकडे ब-याच व्यापारी संघटनांकडून त्याचबरोबर महानरगपालिका आयुक्तांकडून ५० कोटीची उलाढाल कशा प्रकारे विचारात घ्यावी म्हणजेच व्यापा-यांची महागनरपालिका क्षेत्रामधील उलाढाल विचारात घ्यावी अथवा व्यापा-यांची राज्यामध्ये इतर ठिकाणी असलेल्या धंद्याची उलाढाल सुध्दा विचारात घ्यावी या विषयी संदीग्धता असल्याने या बाबत शासनाने स्पष्टीकरण करावे. अशी मागणी करण्यात आली आहे. या अनुषंगाने विधी व न्याय विभागाचे अभिमत प्राप्त करून घेण्यात आले असून ते पुढील प्रमाणे आहे :- The words ' sale therein' in the words consumption use or sale therein, in the definition of Local Body Tax means sale of taxable goods to a person for the purpose of consumption or use by such person in the Local Body Tax area. It means for registration of Local Body Tax turnover regarding the business of the dealer within the corporation area is required to be considered and not the turnover in relation to the business of the dealer within the entire State of Maharashtra.

**ii) महानगरपालिकांचे उत्पन्नामध्ये येणा-या तूटीबाबत.**

शासनाने ५० कोटीपेक्षा कमी उलाढाल असलेल्या व्यापा-यांना LBT मधून सूट दिल्याने महानगरपालिकांचे स्थानिक संस्था करापासूनच्या उत्पन्नामध्ये येणारी तूट भरून काढण्यासाठी शासनाकडून १% मुद्रांक शुल्क अधिभार व महानगरपालिकांना ५० कोटीपेक्षा जास्त उलाढाल असलेल्या व्यापा-यांकडून प्राप्त होणारे LBT चे उत्पन्न या मध्ये व महानगरपालिकेस मागील ५ वर्षातील सर्वोच्च उत्पन्नावर ८% वाढ विचारात घेवून सन २०१५-१६ चे उत्पन्न निश्चित करण्यात आलेले उत्पन्न यामध्ये येणारी तूट भरून काढण्यासाठी शासनाकडून दरमहिन्याच्या पहिल्या आठवडयामध्ये सहाय्यक अनुदान वितरीत करण्यात येणार आहे. त्यामुळे महानगरपालिकेच्या उत्पन्नामध्ये कोणतीही घट येणार नाही याची शासनाने पुरेपूर काळजी घेतलेली आहे.

iii) **५० कोटी किंवा त्या वरील जास्त उलाढाल व्यापा-यांच्या माहिती.**

महानगरपालिकांना देय होणा-या सहाय्यक अनुदानाची परीगणना करण्यासाठी महानगरपालिकांना ५० कोटी किंवा त्यापेक्षा जास्त ज्या व्यापा-यांची उलाढाल आहे अशा व्यापा-यांनी स्थानिक संस्था करापोटी भरलेल्या स्थानिक संस्था कराची परीगणना करणे आवश्यक आहे. सदरची परीगणना करण्यासाठी प्रत्येक महानगरपालिकांनी त्यांच्या परीक्षेत्रात स्थानिक संस्था कर भरण्याकरीता असलेल्या व्यापा-यांची यादी करणे आवश्यक आहे. यादी विश्वासार्ह (Authentic) होण्याकरीता प्रत्येक महानगरपालिकेने त्यांच्या हद्दीतील विक्रीकर विभागाकडून त्यांच्याकडे नोंदीत असलेले व ज्या व्यापा-यांची उलाढाल ५० कोटी वा त्या पेक्षा जास्त आहे त्यांची माहिती घेण्यात यावी. उपलब्ध झालेली माहिती व महानगरपालिकेकडे असलेली माहिती tally करण्यात यावी. विक्रीकर विभागाकडून प्राप्त झालेल्या यादीत नाव असलेला व्यापारी जर महानगरपालिकेकडे स्थानिक संस्था कर भरत नसेल तर व्यापा-यास बोलावून त्यांच्या स्थानिक संस्था निहाय्य उलाढालीची गणना करण्यात यावी जर त्यांची उलाढाल स्थानिक संस्था हद्दीत ५० कोटीपेक्षा अधिक असेल तर त्यास नोंदणी होण्यास भाग पाडावे. प्रत्येक महिन्यात चलनाच्या प्रतीसह नगरविकास विभागाकडे खालील दिलेल्या तक्त्यानुसार संबंधित व्यापा-यांची माहिती करभरणा झाल्यानंतर १५ दिवसात पाठवावी.

| अ.क्र | व्यापा-याचे नाव | स्थानिक संस्था कराचा भरणा | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ऑग | संप्टे | ऑक्टो | नोव्हें | डिसें | जाने | फेब्रु | मार्च | एकुण |
| | | | | | | | | | | |

iv) **उपयोगीता प्रमाणपत्रे सादर करणेबाबत**

शासनाकडून महानगरपालिकांना १% मुद्रांक शुल्क अनुदान व प्रत्येक महिन्याला स्थानिक संस्था कराच्या उत्पन्नामध्ये येणा-या तुटीच्या भरपाईसाठी द्यावयाचे अनुदान वितरीत करण्यात येते तथापि, महानगरपालिकांकडून अनुदान प्राप्त झाल्यानंतर त्याची उपयोगीता प्रमाणपत्रे त्वरीत शासनास सादर केली जात नाहीत. असा आतापर्यंतचा अनुभव आहे. यामुळे महानगरपालिकांना अनुदानाचा पुढील हप्ता वितरीत करण्यास विलंब होत आहे. तरी आयुक्तांनी स्व:ता जातीने लक्ष घालून, शासनाकडून प्राप्त झालेल्या अनुदानाची उपयोगीता प्रमाणपत्रे त्वरीत शासनास सादर केली जातील याची खबरदारी घ्यावी.

**आपला**

**(गो.आ.लोखंडे.)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत

कार्यासन — नवि-३२ संग्रहार्थ